# <u>प्रेसनोट</u>

जा.क्र.पोउप-आ/वाहतूक/          /२०१८                                        पुणे शहर, दिनांक – १६.०१.२०१८

**<u>विषय</u> :- मोटार वाहनांवर अनधिकृतपणे क्रॅश गार्ड/बुल बार लावले बाबत करण्यात आलेल्या कारवाई बाबत.**

--------oo---------

सडक परिवहन आणि राजमार्ग मंत्रालय भारत सरकार यांचेकडील नं.आरटी-११०२१/३८/२०१७-एमव्हीएल दिनांक- ०७ डिसेंबर २०१७ चे नोटीफिकेशन नुसार वाहनचालक हे मोटार वाहनांवर अनधिकृतपणे क्रॅश गार्ड/बुल बार लावत असतील तर सदर वाहनचालक हे कलम-५२ मोटार वाहन कायदा १९८८ प्रमाणे उल्लंघन करीत असून त्यांचेवर मोटार वाहन कायदा १९८८ च्या कलम १९० व कलम १९१ प्रमाणे कारवाई करण्यात येत आहे. दिनांक- ०४/०१/२०१८ रोजी पासून मोटार वाहनांवर अनधिकृतपणे क्रॅश गार्ड/बुल बार लावले बाबत पुणे शहर वाहतूक शाखेकडून एकुण ८९२ वाहनांवर कारवाई करण्यात आली असून त्यापोटी ४,५१,५००/-रुपये तडजोड रक्कम वसूल करण्यात आली आहे.सदरची कारवाई यापुढेही परिणामकारक चालू ठेवण्यात येणार आहे.

तरी नागरीकांना/वाहनचालकांना याव्दारे असे आवाहन करण्यात येते की, मोटार वाहनांवर अनधिकृतपणे क्रॅश गार्ड/बुल बार लावले असेल तर ते काढून टाकावे व त्याबाबत होणारी कारवाई टाळावी व सदर बाबतचे नियमांचे तंतोतंत पालन करून वाहतुक पोलीसांना सहकार्य करावे.